**मुंढरी, एकलारी व मोहाडी पाणी पुरवठा योजना (ता.मोहाडी, जि. भंडारा) या तीन योजनांच्या कामाच्या देयकासंदर्भात न्यायालयाच्या निर्णयानुसार रक्कम अदा करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः ग्रापापु-१२१८/ प्र.क्र. ६७/पापु-१३**
**मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक**
**मुंबई-४०० ०३२**
**तारीखः २१ मे, २०१८**

वाचा -

१) मा. दिवाणी न्यायालयाचे आदेश दिनांक १८ सप्टेंबर, २०१५.
२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. ग्रापुपु-२०१७/प्र.क्र. १५/पापु-१०, दि. २५/१०/२०१७
३) संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई यांचे क्र. मजीप्रा/वित्त-२/ निधी/कोर्ट/ भूसंपादन/५२६, दिनांक ४/१२/२०१७ चे पत्र.
४) श्री. एस.के साहनी यांनी मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांना दिलेले दिनांक ७/२/२०१८ चे निवेदन.
५) संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई यांचे क्र. मजीप्रा/वित्त-२/ निधी/८४/२०१८, दिनांक २०/३/२०१८ चे पत्र.
६) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे क्र. मजीप्रा/मुअना/प्रलि./१९/२०१८, दिनांक ९/४/२०१८ चे पत्र.

**प्रस्तावना**

मुंढरी, एकलारी व मोहाडी पाणी पुरवठा योजना, ता. मोहाडी, जि. भंडारा या तीन योजनांची कामे कंत्राटदार श्री. एस.के. साहनी यांना सोपविण्यात आली होती. सदर तिन्ही योजनांची अंतिम देयक तयार करताना योजनेचा घेण्यात आलेले मोजमाप व लेखाजोखा, तिन्ही योजनांचे कंत्राटदार श्री. एस.के. साहनी यांनी मान्य नसल्यामुळे स्विकारण्यास नकार दिला. सदर प्रकरणी योजनेचे कंत्राटदार श्री. साहनी यांनी दिवाणी न्यायालयात स्पेशल सिव्हील सूट क्र. ०९/२००७ दावा दाखल केला.

दिवाणी न्यायालयात श्री. साहनी यांनी दाखल केलेल्या दाव्यासंदर्भात सं.क्र. १ येथील न्यायालयाच्या निवाडयाप्रमाणे सदर तिन्ही योजनांकरीता रु. ९,५३,५६२/- एवढी रक्कम, दर साल १२ टक्के व्याजासह न्यायालयात भरण्याचा निर्णय दिला आहे. त्यानुसार, सदर प्रकरणी, न्यायालयीन निणर्यानुसार सर्व क्लेम व्याजासह कंत्राटदारास अदा करावयाचे असल्याने, सदर रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास व्याजासह न्यायालयात भरावयाची आहे. तरी न्यायालयात रक्कम भरणेकरीता निधी उपलब्ध करण्याबाबत संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये प्रस्ताव शासनास सादर केला होता.

शासनाच्या संदर्भ क्र. २ अन्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजना अंतर्गत उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार भरपाईची रक्कम अदा करण्याकरीता स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात आले आहे. या लेखाशिर्षाखाली सदर न्यायालयीन प्रकरणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास निधी उपलब्ध करुन देता येईल.

मौजे मुंढरी, एकलारी व मोहाडी पाणी पुरवठा योजना, ता. मोहाडी, जि. भंडारा या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कामाबाबत, योजनेचे कंत्राटदार यांनी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यासंदर्भात न्यायालयाच्या निवाडयाप्रमाणे सदर तिन्ही योजनांकरीता रु. ९,५३,५६२/- एवढी रक्कम, दर साल १२ टक्के व्याजासह न्यायालयात भरण्याचा निर्णय दिला आहे. त्यानुसार, व्याजाची परिगणना करुन रु. २१,८०,४७७/- एवढी रक्कम न्यायालयात भरण्याकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी संदर्भ क्र. ६ अन्वये कळविले आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

मुंढरी, एकलारी व मोहाडी पाणी पुरवठा योजना, ता. मोहाडी, जि. भंडारा या तीन योजनांचे कंत्राटदार श्री. एस.के. साहनी यांनी दाखल केलेल्या दाव्यासंदर्भात न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार, न्यायालयात भरणा करण्याकरीता एकूण रु. २१,८०,४७७/- ( रुपये एकवीस लक्ष ऐंशी हजार चारशे सत्त्याहत्तर फक्त ) इतकी रक्कम पुढील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१) मौजे मुंढरी, एकलारी व मोहाडी पाणी पुरवठा योजना, ता. मोहाडी, जि. भंडारा या योजनांच्या कामाच्या देयकासंदर्भात न्यायालयीन निर्णयानुसार व्याजासह अचूक

परिगणना करण्यात आली असल्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्तरावर पुन्हा खात्री करण्यात यावी.

२) सदर रक्कम ही संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे स्तरावर पडताळणी केलेली आहे, या अटीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

३) सदर रक्कम ही मौजे मुंढरी, एकलारी व मोहाडी पाणी पुरवठा योजना, ता. मोहाडी, जि. भंडारा या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कामाबाबत, कंत्राटदार श्री. साहनी यांनी दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या स्पेशल सिव्हील सूट क्र. ०९/२००७ बाबत मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अदा करण्याकरीता वापरण्यात यावी. याव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी सदर निधी उपायोगात न आणता उर्वरीत निधी शासनास परत करण्याची दक्षता घ्यावी.

४) सदरहू रक्कम दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या स्पेशल सिव्हील सूट क्र. ०९/२००७ बाबत मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अंतिमत: परिगणित केल्यानुसार वितरीत करण्यात येत आहे. तरी यापुढे सदर योजनेच्या देयकासंदर्भात कोणतीही जादाची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

५) सदर रक्कम वितरीत केल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ शासनास सादर करावे.

२. या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना मंजूर व मुक्त करण्यात आलेला रु. २१,८०,४७७/- ( रुपये एकवीस लक्ष ऐंशी हजार चारशे सत्त्याहत्तर फक्त ) याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संचालक (वित्त ) (श्री. सुधाकर डांगे ) यांच्या स्वाक्षरीने तयार केलेले व उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (श्री. म.भ. सावंत) यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावे. या प्रयोजनासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संचालक (वित्त) ( श्री. सुधाकर डांगे) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यातयेत आहे. तसेच उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (श्री.म.भ. सावंत) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रक्कम NEFT प्रणालीद्वारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांच्या खाती जमा करण्यात यावी.

३. वरील प्रयोजनासाठी मंजूर केलेला रु. २१,८०,४७७/- एवढा खर्च “मागणी क्र. वाय-०२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१- पाणी पुरवठा, १०२-ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, (०२) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, ग्रामीण पाणी पुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान (२२१५, ए ०१४) ५०, इतर खर्च (भारीत)” या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. न्याकभ-१०.१०/प्र.क्र. २४/अर्थसंकल्प-२, दिनांक ११/२/२०१० व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दिनांक २/४/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५११९१२०४२७५७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh D. Ambekar

Digitally signed by Suresh D. Ambekar
DN: CN = Suresh D. Ambekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2018.05.21 14:03:00 +05'30'

**( सु.दे.आंबेकर)**
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
२) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
३) विरोधी पक्ष नेता, विधान सभा/विधान परिषद, विधान मंडळ, मुंबई.
४) मा.विधानमंडळ सदस्य (सर्व)
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
६) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१/ महाराष्ट्र-२, मुंबई/ नागपूर.
७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१/ महाराष्ट्र-२,मुंबई/ नागपूर.

८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९) जिल्हाधिकारी, भंडारा
१०) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर.
११) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नागपूर
१२) संचालक(वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर,नवी मुंबई.
१३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, भंडारा
१४) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१५) मु.अ. तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१६) कार्यासने (पापु-०४, ०६,०७,०९,१०,१७,१८ व २०), पा. पु. व स्व. वि.,मंत्रालय,मुंबई-३२.
१७) निवडनस्ती कार्यासन पापु-१३.